ePaper
मराठी-हिंदी वादात राज्यपाल राधाकृष्णन यांची उडी, नवा वाद पेटणार?
| वर्ष - 8 | अंक - 344 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

## आतील पानांत

- विराटने मला त्याचा नंबर दिला
- हार्दिक -जास्मिन वालियाचे ब्रेकअप?
- न्यायालयात येण्याचीही हिंमत नाही का?
- आम्ही तुमची अर्थव्यवस्था उद्ध्वस्त करू

www.mahaenews.com | बुधवार, दि. 23 जुलै 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

# वाढदिवसानिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर चोहोबाजूंनी स्तुतिसुमने : देशातील 'चॅलेंजिंग' नेतृत्व!

# One & Only देवेंद्र!

## शरद पवार, उद्धव ठाकरे यांच्यासह तमाम विरोधकांकडून मुख्यमंत्र्यांचे कौतुक

## 'महायुती' तील नेते देवाभाऊंवर फिदा..

| मुंबई | प्रतिनिधी | महाईन्यूज

**भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते, 'महायुती' चे नेते देवेंद्र फडणवीस यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना आणि त्यांचे अभिनंदन करताना 'महायुती' मधील नेते त्यांच्या कर्तव्यतत्परतेचे कौतुक करत होते, तर शरद पवार, उद्धव ठाकरे यांच्यासारखे विरोधी पक्षांचे नेते सुद्धा त्यांच्यावर चोहोबाजूंनी स्तुतिसुमने उधळताना दिसले तर देशातील एक 'चॅलेंजिंग' सुसंस्कृत, सुजाण आणि सूज्ञ नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे अवघा देश पाहत असल्याचे संकेत त्यामुळे मिळाले.**



### राज्यात सर्वत्र रक्तदान शिबिरे

फडणवीस यांनी वाढदिवसाच्या निमित्ताने जाहिराती किंवा फलक न लावण्याचे आवाहन केले होते. त्याऐवजी समाजोपयोगी कार्यक्रम हाती घ्यावेत असे त्यांनी आवाहन केले होते. त्याचाच एक भाग म्हणून भारतीय जनता पार्टीच्या सर्व कार्यकर्त्यांनी आणि नेत्यांनी आपापल्या भागात मोठ्या प्रमाणावर रक्तदान शिबिरांचे आयोजन केल्याचे दिसले. अनेक ठिकाणी शाळांमध्ये, गोरगरिबांना तसेच वंचित आणि उपेक्षितांना त्यांच्या उपयोगाचे साहित्य देण्यात आले.

### मोदी शाहांसह सर्व मंत्र्यांच्या शुभेच्छा..

पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह यांच्यासह सर्वच केंद्रीय तसेच राज्यातील मंत्र्यांनी फडणवीस यांना शुभेच्छा दिल्या आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचाही वाढदिवस असल्याने त्यांच्यावरही शुभेच्छांचा वर्षाव झाला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी फडणवीस यांच्या मैत्री बाबत गौरवोद्गार काढले आहेत.

### शरद पवार काय म्हणाले?

ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी शुभेच्छा देताना म्हटले आहे, की देवेंद्रांच्या कार्याची गती अफाट असून ते थकत कसे नाहीत? हा प्रश्न मला पडतो. राज्याचे मुख्यमंत्री आणि राष्ट्रीय राजकारणातील उदयोन्मुख नेतृत्त्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. एरवी वैचारिक मतभिन्नतेमुळे शरद पवार आणि फडणवीस हे एकमेकांवर अनेकदा टीका करताना दिसतात. मात्र, फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त गिरीश महाजन यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या 'महाराष्ट्र नायक' या पुस्तकात शरद पवार यांनी देवेंद्र फडणवीस यांची मुक्तकंठाने स्तुती केली आहे.

### लवकरच केंद्रात मोठी जबाबदारी..

देवेंद्र फडणवीस हे अतिशय हुशार राजकारणी असून भविष्यात त्यांना केंद्रात मोठी जबाबदारी मिळण्याची शक्यता आहे असे सांगत उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्र्यांवर कौतुकाचा वर्षाव केला. समोर आलेल्या आव्हानांवर आपल्या अभ्यासू आणि मुत्सद्दी स्वभावाने मात करुन त्यांनी आपली विश्वासार्हता वाढवली असे उद्धव ठाकरे म्हणाले. फडणवीसांची प्रतिमा ही एक गतिमान, अभ्यासू आणि पक्षनिष्ठ राजकारणी अशी आहे असे उद्धव ठाकरे म्हणाले.

### कामाची गती अफाट..

फडणवीस यांच्या कामाची गती अफाट असल्याचे मत शरद पवार यांनी नोंदवले आहे. दोन भिन्न विचारधारेचे प्रवाह समांतर वाहत असताना त्यांनी एकमेकांविषयी काय बोलावे अन् बोलायचंच म्हटलं तर दोन्ही प्रवाहांची गती सारखी हवी. मी माझा वेग अजूनही अबाधित ठेवला आहे आणि फडणवीसांच्या कार्याची गती अफाट आहे, हे कसे काय नाकारता येईल ? फडणवीस यांच्या कामाचा झपाटा आणि उरक पाहिला की, मला मी पहिल्यांदा मुख्यमंत्री झालो, तो काळ आठवतो. फडणवीसांची देखील ही गती ते माझ्या वयाचे होईपर्यंत राहो आणि कालचक्रमानाने ती वृद्धिंगत होत राहो, असे अभिष्टचिंतन त्यांच्या वाढदिवसानिमित्त करतो, असे शरद पवार यांनी म्हटले आहे.

### पवारांकडून स्वत:ची देवेंद्र यांच्याबरोबर तुलना..

क्रीयाशील राहण्यासाठी प्रकृती शिडशिडीत असावी, असे म्हटले जाते. पण, आम्हा दोघांतील साम्य लक्षात घेता आमच्या कार्यक्षमतेत स्थूलपणा कधी आडवा आला नाही. विनोदाचा भाग सोडला तर त्यांचे कष्ट पाहून 'ते थकत कसे नाहीत?' असा प्रश्न मलाही पडतो. ही त्यांच्या कार्याची पोचपावती आहे. फडणवीसांना राजकारणाचे बाळकडू जरी घरातून मिळाले तरी वडिलांच्या अकाली निधनाच्या धक्क्यातून सावरणे, उभे राहणे आणि नेटाने पुढे जाणे हे आव्हानात्मक होते. देवेंद्र कायद्याचे पदवीधर असल्याने ते पट्टीचे हजरजबाबी, संवादकुशल आहेत. वागण्यात आणि बोलण्यात कमालीचे तारतम्य ही त्यांची जमेची बाजू आहे. या गुणांच्या आणि उपजत बुद्धिचातुर्याच्या बळावर त्यांनी सत्तेत नसतानादेखील आपल्या कार्यक्षमतेचा ठसा उमटवला आहे, असेही शरद पवार यांनी कौतुक केले आहे.

### स्वत:ला सिद्ध केले...

कौटिल्याने अर्थशास्त्रात राजसत्ता अबाधित राहून तिचा विस्तार व्हावा. जनतेचे हित जपावे व जनकल्याणात वृद्धी व्हावी असे सांगितले आहे. कौटिल्याची योगक्षेम या राजकीय संकल्पनेत राज्यकर्त्यांचे अंतिम ध्येय केवळ राजकीय स्थैर्य प्राप्ती नाही तर जनहित आहे. देवेंद्र यांनी स्वतःला सिद्ध केले आहे. त्यामुळे त्यांनी राजकीय आखाड्याबाहेरील क्षितीजे अधिकाधिक पार करावीत, अशी माझी अपेक्षा आहे. त्यांच्या हातून व्यापक जनहिताची कार्ये पार पडतील, देशहितासाठी त्यांचे योगदान लाभो, याकरिता माझ्या शुभेच्छा आहेत. देवेंद्र फडणवीस महाराष्ट्राची अस्मिता राखण्यासाठी, महाराष्ट्र धर्म वाढवण्यासाठी, महाराष्ट्राची पुरोगामी, विज्ञानवादी आणि सांस्कृतिक परंपरा पुढे नेण्यासाठी अधिक स्वयंभू होवोत. त्यासाठी त्यांना उत्तम आरोग्य आणि दीर्घायुष्य लाभो ही सदिच्छा वाढदिवासानिमित्ताने व्यक्त करतो, असे शरद पवार यांनी या लेखात म्हटले आहे.

# खड्ड्यांच्या तक्रारीसाठी पालिकेचे पाऊल!

## खड्ड्यांची तक्रार करण्यासाठी पालिकेने हे ॲप तयार केले

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**शहरातील रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यांची तक्रार नागरिकांना महापालिकेकडे करता यावी, यासाठी महापालिकेने 'पीएमसी रोड मित्र ॲप' तयार केले आहे. या ॲपच्या माध्यमातून नागरिकांना रस्त्यावरील खड्ड्यांचे फोटो थेट महापालिका प्रशासनाला पाठवता येणार आहेत.**



पुणे शहर खड्डेमुक्त करण्यासाठी हे ॲप तयार करण्यात आले असून, पुढील काही दिवसांतच ते कार्यान्वित केले जाणार आहे.शहरातील अनेक भागांतील रस्त्यांवर महापालिकेच्या पथ विभागाने दुरुस्तीची कामे केली आहेत. मात्र, त्यानंतरही अनेक ठिकाणी खड्डे पडल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. पावसामुळे रस्त्यांवर खड्डे पडत असून, खड्ड्यांमधील खडी बाहेर येत आहे. या खड्ड्यांमध्ये पाणी साठत असल्याने वाहने चालविताना नागरिकांना कसरत करावी लागते.रस्ते खोदाईनंतर अनेक ठिकाणी डागडुजीचे काम योग्य पद्धतीने न झाल्याने रस्त्यांवर खड्ड्यांची संख्या वाढत आहे. महापालिकेच्या पथ विभागकडे वारंवार तक्रारी करूनही त्याकडे दुर्लक्ष केले जात असल्याची तक्रार नागरिकांकडून केली जाते. रस्ते खोदाईनंतर महापालिकेने केलेल्या वरवरच्या मलमपट्टीमुळे रस्त्यांवर खड्डे पडत आहेत. याची थेट तक्रार नागरिकांना करता यावी, यासाठी महापालिकेने 'पीएमसी रोड मित्र ॲप' तयार केले आहे.हे मोबाईल ॲप असून, याद्वारे नागरिकांना खड्ड्यांचा फोटो घेऊन तो ॲपच्या माध्यमातून अपलोड करावा लागणार आहे. हे करताना संबंधित ठिकाणांचे अक्षांश आणि रेखांक्ष फोटोमध्ये दिसणार असल्याने या खड्ड्यांच्या जागेची निश्चित माहिती महापालिकेला प्रशासनाला समजणार आहे. तक्रार आल्यानंतर त्यावर कार्यवाही केली जाणार आहे. त्यानंतर संबंधित तक्रारदाराला खड्डे बुजविल्याचा फोटो पाहता येणार आहे. या ॲपचे लवकरच आयुक्त नवल किशोर राम यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे.

याबाबत अधिक माहिती देताना महापालिकेचे पथ विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर म्हणाले, 'महापालिकेने तयार केलेल्या या ॲपवर नागरिक खड्ड्याच्या ठिकाणचे दोन ते तीन फोटो, तसेच व्हिडिओ अपलोड करू शकतात. ॲपच्या माध्यमातून आलेल्या फोटोंवर जागेची माहिती मिळणार आहे. ही माहिती संबंधित भागातील महापालिकेच्या अधिकाऱ्यांकडे आपोआप पाठविली जाईल. तक्रार प्राप्त झाल्यानंतर संबंधित कनिष्ठ अभियंत्याला संबंधित भागात जाऊन खड्डा बुजवून त्याचे फोटो त्या तक्रारीच्या ठिकाणी अपलोड करावे लागणार आहेत. ते अपलोड केल्यानंतर संबंधित तक्रारदाराला पूर्वीची स्थिती आणि काम केल्यानंतरची स्थिती दोन्ही दिसणार आहे. त्यानंतरच होणार आहे.'शहरातील खड्डे बुजविण्यासाठी पथ विभागाने तयार केलेले ॲप उपयुक्त ठरणार आहे.

### तक्रारदाराला संपूर्ण माहिती मिळणार

सध्या हे ॲप अन्ड्रॉइड व्हर्जनमध्ये उपलब्ध करून देण्यात आले आहे. नागरिक आपल्या मोबाईलच्या प्ले-स्टोअर मधून ते डाउनलोड करु शकतात. पीएमसी रोड मित्र ॲप वर तक्रार प्राप्त झाल्यानंतर संबंधित तक्रारीचे काय झाले, याचे डॅशबोर्ड पथ विभाग प्रमुखांना दिसणार आहे. त्यामुळे एखाद्या भागातील तक्रारी नक्की काय झाले? कोणत्या अधिकाऱ्यांनी तक्रारीचे निवारण केले? किंवा दुर्लक्ष केले याची सविस्तर माहिती विभाग प्रमुखांना समजणार आहे, असे अनिरुद्ध पावसकर यांनी सांगितले. रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांची तक्रार करण्यासाठी महापालिकेने हे ॲप तयार केले आहे.अधिकारीदेखील फोटो अपलोड करणार असल्याने तक्रारदाराला संपूर्ण माहिती मिळणार आहे.

---

# सणासुदीत नैसर्गिक फूलबाजारासमोर आव्हान

## कृत्रिम फुलांवर बंदी घालून नैसर्गिक फुले उत्पादकांना न्याय द्यावा

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**कृत्रिम फुलांची सजावट करण्याचे वाढते प्रमाण नैसर्गिक फुलांचा वापर करण्याला मारक ठरत आहे. घरामध्ये ऊर्जा निर्माण करणाऱ्या नैसर्गिक फुलांचा सुवास घेत गणरायाची सजावट करावी, हे आपल्या उत्सवातून अभिप्रेत आहे. त्यामुळे कृत्रिम फुलांच्या वापरावर बंदी घालून नैसर्गिक फुले फुलविणाऱ्या उत्पादकांना न्याय द्यावा, अशी मागणी फुलांच्या व्यापाऱ्यांकडून होत आहे.**



धार्मिक समारंभ, उत्सव, घरातील शुभकार्य आणि चातुर्मासातील व्रतवैकल्ये अशा प्रत्येक प्रसंगी फुलांचा वापर हे आपल्या संस्कृतीचे खास वैशिष्ट्य आहे. विविध सुवासिक फुलांचे हार आणि तोरण या माध्यमातून सजावट ही प्रत्येक कार्यक्रमाची आवश्यकता असते. मात्र, त्यासाठी नैसर्गिक फुलांचा वापर करण्याऐवजी अनेकदा कृत्रिम फुलांचा वापर करण्यावर भर दिला जातो. त्याचा फटका फुलांची निर्मिती आणि विक्री करणाऱ्या उत्पादकांना बसत आहे. हे ध्यानात घेऊन कृत्रिम फुलांच्या वापरावर राज्य शासनाने बंदी घालावी, अशी मागणी फूल उत्पादक व्यापाऱ्यांकडून होत आहे.'यापूर्वी प्लास्टिक फुलांचा वापर करून सजावट केली जात होती. मात्र, आता कागदी, कापडी, सॅटिन आणि लोकर अशा साहित्याचा वापर करून कृत्रिम फुलांची निर्मिती केली जात असून, गेल्या काही वर्षांत त्याची बाजारपेठ वाढत आहे.

कृत्रिम फुलांचा वापर करून केली जाणारी सजावट हा विषय केवळ गणेशोत्सवापुरता मर्यादित नाही तर, घरातील शुभकार्याप्रसंगी कृत्रिम फुलांची सजावट करण्याकडे कल वाढला आहे. फूल उत्पादक शेतकरी जगला पाहिजे ही भूमिका ध्यानात घेऊन शासनाने कृत्रिम फुलांच्या वापरावर बंदी घालावी, अशी व्यापाऱ्यांची मागणी आहे,' असे मार्केट यार्ड येथील फुलांचे व्यापारी सागर भोसले यांनी सांगितले.

मार्केट यार्ड फूल बाजारामध्ये जिल्ह्यातील १५ ते २० हजार शेतकरी आपली फुले विक्रीसाठी पाठवतात. बाजारात झेंडू, शेवंती, गुलछडी, ॲस्टर, डच गुलाब, जर्बेरा, कार्नेशियन यांसह विविद प्रकारची फुले आणि पाने विक्रीसाठी येतात.

सजावटीमध्ये कृत्रिम फुलांचा वापर वाढल्याने फूल उत्पादक शेतकऱ्यांच्या फुलांना रास्त दर मिळत नाही. दर मिळत नसल्याने बाजारपेठेमध्ये फुलांची आवक जवळपास ५० टक्क्यांनी घटली आहे.धार्मिक समारंभ, उत्सव, घरातील शुभकार्य आणि चातुर्मासातील व्रतवैकल्ये अशा प्रत्येक प्रसंगी फुलांचा वापर हे आपल्या संस्कृतीचे खास वैशिष्ट्य आहे.

### कृत्रिम फुलांच्या वापरावर बंदी घालावी

विविध सुवासिक फुलांचे हार आणि तोरण या माध्यमातून सजावट ही प्रत्येक कार्यक्रमाची आवश्यकता असते. मात्र, त्यासाठी नैसर्गिक फुलांचा वापर करण्याऐवजी अनेकदा कृत्रिम फुलांचा वापर करण्यावर भर दिला जातो. त्याचा फटका फुलांची निर्मिती आणि विक्री करणाऱ्या उत्पादकांना बसत आहे. हे ध्यानात घेऊन कृत्रिम फुलांच्या वापरावर राज्य शासनाने बंदी घालावी.

## आरटीओचे दुर्लक्ष, खासगी बसचे भाडे दामदुपट्ट

# एमआयडीसीतील रस्त्यांची चाळण!

## रस्त्यांच्या दयनीय अवस्थेमुळे उद्योजकांसह नागरिक त्रस्त

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी चिंचवड: महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) क्षेत्रातील रस्त्यांची दयनीय अवस्था झाली आहे. रस्त्यांवरील डांबराचा वरचा थर निघून गेल्यामुळे रस्त्यांची अक्षरशः चाळण झाली आहे.परिणामी, दुचाकीस्वारांना वाहन चालविणे अवघड, जिकिरीचे झाले आहे. अनेकांना आरोग्याच्या**



पिंपरी-चिंचवड शहराची औद्योगिकनगरी म्हणून ओळख आहे. शहरालगत भोसरी आणि चाकण येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) क्षेत्र विकसित झाले आहे. या परिसरामध्ये आठ हजारांहून अधिक प्लॉटधारक असून, बहुउद्देशीय कंपन्यांना सुटे भाग पुरविणाऱ्या पाच हजाहून अधिक लघुउद्योग आहेत. या भागातील आणि तळेगाव, रांजणगाव, अहिल्यानगर एमआयडीसीतील कंपन्यांमध्ये कच्चा आणि पक्का माल वाहतूक करणारी हजारी वाहने दररोज ये-जा करतात. तसेच एमआयडीसीत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना ने-आण करणाऱ्या बसची संख्या देखील मोठ्या प्रमाणावर आहे.

### खड्ड्यांमुळे अपघात वाढले

एमआयडीसीतील डांबरी रस्त्यांवरील वरचा थर निघून गेल्यामुळे खडी वर आली आहे . काही ठिकाणी रस्त्यांवर मोठे खड्डे पडले आहेत. त्यामुळे या रस्त्यावरून दुचाकी चालविणे कठीण झाले आहे. दररोज या मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांना आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. प्रशासनाने लवकरात लवकर रस्ते दुरुस्ती करावेत, अशी मागणी वाहनचालकांकडून होत आहे.

### प्रशासनाचे कानावर हात

एमआयडीसीत पावसामुळे खड्डे पडून रस्त्यांची चाळण झाली आहे. भोसरी आणि चिंचवड एमआयडीसी परिसरात विविध सुविधा देण्याची जबाबदारी पिंपरी-चिंचवड महापालिकेची असल्याचे एमआयडीसी प्रशासनाचे म्हणणे आहे. पण, महापालिका प्रशासनाकडूनही रस्त्यांची देखभाल दुरुस्ती होत नाही. दोन्ही प्रशासनांनी रस्ते दुरुस्तीवरून एकमेकांकडे बोट दाखवत जबाबदारी उकलण्याचा प्रयत्न होत आहे.

### हे रस्ते खराब

लांडेवस्ती ते इंद्रायणीनगर , इंद्रायणीनगर ते स्पाइन रोड
केएसबी चौक ते एमआयडीसी कार्यालय
आयुक्त बंगला ते सायन्स पार्क
महाळुंगे पोलिस ठाणे चौक ते इंडोरन्स चौक एचपी चौक ते इंडोरन्स चौक

> पाऊस सुरू असल्याने आम्ही खडी आणि मुरूम टाकून खड्डे बुजविण्याचे काम सुरू आहे. पावसाने उघडीप दिल्यानंतर डांबर टाकणार आहे.
> **-प्रकाश भडंगे,** कार्यकारी अभियंता, चाकण एमआयडीसी.

---

## नेत्र रुग्णांच्या आयुष्यात पसरतोय 'प्रकाश'!

## मासुळकर रुग्णालयात चार वर्षांत 220 जणांचे नेत्रदान

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहरातील शंकरराव मासुळकर नेत्र रुग्णालयात गेल्या चार वर्षांत २२० जणांनी नेत्रदान केले. ज्यांनी हे दान केले, त्यांच्यामुळे गरजू नेत्र रुग्णांच्या आयुष्यात प्रकाश निर्माण झाला आहे. महापालिकेच्या मासुळकर नेत्र रुग्णालयाला नेत्र प्रत्यारोपणासाठी आवश्यक ती मान्यता मिळालेली नाही. त्यामुळे खासगी रुग्णालयाशी सामंजस्य करार करून ही प्रक्रिया केली जात आहे.**



नेत्रदानाबाबत असलेल्या गैरसमजुती, जागरूकतेचा अभाव, या प्रक्रियेविषयी असलेले अज्ञान नागरिकां मध्ये नेत्रदानाबाबत उदासीनता दिसून येते. मात्र, याबाबत व्यापक जनजागृती केल्यास नक्कीच नेत्रदानाची टक्केवारी वाढेल, असा विश्वास व्यक्त होत आहे नेत्रदानाची प्रक्रिया किचकट व वेळखाऊ आहे. नेत्रदानासाठी मृतदेह रुग्णालयात न्यावा लागतो, नेत्रदानाची प्रक्रिया ही अत्यंत सोपी आहे, केवळ तीन मिनिटांच्या कालावधीत ही प्रक्रिया होते. त्यासाठी मृतदेह रुग्णालयात घेऊन जाण्याची गरज नाही. नेत्रपिढीला फोन केल्यास संबंधित तज्ज्ञ घरी येतात आणि दृष्टिपटल काढतात नेत्रदान म्हणजे पूर्ण डोळा काढत नाहीत, तर फक्त नेत्रपटल काढले जातात. त्यामुळे चेहरा विद्रूप होत नाही.

### रुग्णालयाकडून जनजागृतीसाठी विविध कार्यक्रम

नेत्रदानविषयीचे गैरसमज दूर होऊन, नेत्रदान करण्यासाठी नागरिकांनी पुढे यावे, यासाठी शंकरराव मासुळकर नेत्र रुग्णालयाकडून विविध कार्यक्रम घेतले जात आहेत. यामध्ये शाळा, महाविद्यालये, आयटी कंपन्या, खासगी अशा ठिकाणी मार्गदर्शन केले जाते. याशिवाय आतापर्यंत नेत्रदान केलेल्या दात्यांची एक भिंत रुग्णालयात उभारली जाणार आहे. रुग्णालयात येणाऱ्या नागरिकांनाही नेत्रदानाचे महत्त्व कळावे, हा या मागील उद्देश आहे.

> नेत्रदानाविषयी पूर्वी गैरसमजुती होत्या. मात्र, मार्गदर्शनातून त्या दूर केल्यास नेत्रदानाचे प्रमाण नक्की वाढेल. अनेकदा मृत व्यक्तिला दृष्टी दान करण्याची इच्छा होती का, याबाबतची माहिती त्याच्या नातेवाईकांना देखील माहिती नसते. त्यामुळे दात्यांनी केवळ नेत्रदानाचा अर्ज न भरता आपली नेत्रदानाची इच्छा नातेवाईकांना सांगणे गरजेचे आहे. अनेकदा नेत्रदान करायचे असून, केवळ प्रक्रिया माहिती नसल्याने नातेवाईक पुढे येत नाहीत. नागरिक, तरुण पिढी यांना जागरूक करण्याचा प्रयत्न करीत आहोत.
> **-डॉ. रूपाली महेशगौरी,**
> विभाग प्रमुख, मासुळकर नेत्र रुग्णालय, पिंपरी-चिंचवड

# उपराष्ट्रपतींचा तडकाफडकी (ना)राजीनामा..कारण काय?





**'स्टेट'मेंट**

**अधिकराव दिवे-पाटील**

संस्थापक, संपादक

**भारताचे उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी अचानकच राजीनामा देऊन देशाच्या राजकारणात खळबळ उडवून दिली आहे. त्यांच्या राजीनाम्यामागील नेमके कारण काय ? याचा शोध अनेक पत्रकारांनी घेतला, पण कारण समजू शकले नाही !**

### भाजपावर खरोखरच नाराजी ?

एका वृत्तानुसार भारतीय जनता पार्टीच्या नेत्यांनी धनखड यांना काहीशी अपमानास्पद वागणूक दिली किंवा त्यांचे निर्णय ऐकले नाहीत, यासाठी संतापून धनखड हे पायउतार झाले, असे समजते. तर दुसरीकडे सायंकाळी साडेपाच वाजता प्रकृतीने ठणठणीत असणारे धनखड प्रकृतीच्या कारणासाठीच साडेसात वाजता राजीनामा का देतात, याचे गौडबंगाल कोणालाच समजले नाही. पण, त्यांनी पद सोडले आहे हे नक्की ! यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दोन ओळींमध्ये त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होवो, असे म्हटले आहे तर राष्ट्रपतींनी त्यांचा राजीनामा त्वरित स्वीकारला आहे, ही पण वस्तुस्थिती आहे!

### तब्येतीचे कारण पुढे..

तब्येतीच्या कारणास्तव धनखड यांनी आपल्या पदाचा तत्काळ राजीनामा दिला, ज्यामुळे संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी राजकीय खळबळ उडाली. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना पत्र लिहून त्यांनी हा निर्णय घेतल्याचे स्पष्ट केले आहे. राजीनाम्याचे कारण गुलदस्त्यात असले, तरी सध्या प्रकृती हेच कारण ग्राह्य धरावे लागेल. वस्तुस्थिती काही दिवसानंतर पुढे येईल, तो भाग वेगळा!

### धनखड यांचा कार्यकाळ वादग्रस्त..

२०२२ पासून उपराष्ट्रपती आणि राज्यसभेचे अध्यक्ष म्हणून कार्यरत असलेल्या धनखड यांचा कार्यकाळ तसा वादग्रस्तच राहिला. विशेषतः, विरोधी पक्षांशी त्यांचे वारंवार खटके उडाले. भारताच्या इतिहासात कार्यकाळ पूर्ण होण्यापूर्वी राजीनामा देणारे ते दुसरे उपराष्ट्रपती ठरले आहेत! यापूर्वी, १९६९ मध्ये व्ही व्ही गिरी यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला होता.

### राष्ट्रपतींना पत्र लिहून कल्पना..

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना पत्र लिहून त्यांनी आपल्या राजीनाम्याची माहिती दिली आहे. तब्येतीची काळजी घेण्यासाठी आणि वैद्यकीय सल्ल्यानुसार मी उपराष्ट्रपतीपदाचा राजीनामा देत आहे. हा निर्णय घटना दुरुस्तीतील अनुच्छेद ६७ (अ) नुसार घेत आहे, असे त्यांनी स्पष्ट केले आहे. धनखड यांनी २०२२ मध्ये उपराष्ट्रपतीपदाची सूत्रे स्वीकारली होती.

आपल्या राजीनाम्यानंतर दिलेल्या निवेदनात त्यांनी भारताच्या विकासाचा भाग होण्याचा अभिमान व्यक्त केला आहे. या ऐतिहासिक बदलाच्या काळात देशाच्या प्रगतीसाठी काम करणे ही माझ्यासाठी सन्मानाची गोष्ट होती,असेही त्यांनी म्हटले आहे.

### धनखड यांच्या विरोधात अविश्वास..

राज्यसभेचे अध्यक्ष म्हणून काम करत असताना धनखड यांचा अनेक वेळा विरोधकांशी वाद झाला, हे जगजाहीर आहे. एकदा तर त्यांच्या विरोधात विरोधी पक्षांनी हटवण्याची सूचना दिली होती, मात्र, ती नाकारण्यात आली होती. त्यांच्या कार्यकाळात संसदीय प्रक्रियेबाबत अनेक वाद निर्माण झाले, हे पण प्रत्येकाच्या लक्षात आहे.

### राजकारणातील लक्षवेधी प्रवास..

धनखड यांचा राजकारणातील प्रवासही लक्षवेधी राहिला आहे. १९८९ मध्ये झुंझुनू (राजस्थान) मतदारसंघातून त्यांनी संसदेत पदार्पण केले. चंद्रशेखर सरकारमध्ये त्यांनी केंद्रीय संसदीय कामकाज राज्यमंत्री म्हणून काम केले. २०१९ मध्ये त्यांनी पश्चिम बंगालचे राज्यपाल म्हणूनही लक्षवेधी भूमिका बजावली होती. मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना त्यांनी अक्षरशः जेरीच आणले होते.

### 'एनडीए'चे उमेदवार म्हणून प्रकाशझोतात..

२०२२ मध्ये भाजपाप्रणित 'एनडीए'ने त्यांना उपराष्ट्रपतीपदासाठी उमेदवार घोषित केले आणि त्यांनी ५२८ मतांनी विजय मिळवला. त्यांच्या प्रतिस्पर्धी मार्गारेट अल्वा यांना फक्त १८२ मते मिळाली होती. धनखड यांच्या राजीनाम्याने राजकारणात नवा रंग भरला असून, त्यांच्या जागी कोण विराजमान होणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे

### नितीश कुमार यांच्या नावाची चर्चा..

जगदीप धनखड यांनी प्रकृतीचे कारण देत उपराष्ट्रपतीपदापासून दूर होण्याचा निर्णय घेतला आहे. धनखड यांच्या राजीनाम्यानंतर आता उपराष्ट्रपतीपदासाठी कोणाची निवड होणार? असा सवाल उपस्थित होत आहे. आता, या पदासाठी थेट नितीश कुमार यांची निवड करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. दुसरे म्हणजे राजस्थानचे राज्यपाल आणि महाराष्ट्रातील ज्येष्ठ नेते हरिभाऊ बागडे त्याचप्रमाणे माजी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांचेही नाव स्पर्धेत आले आहे.

### भाजपाच्या खासदाराची मागणी..

उपराष्ट्रपतीपद बिहारला द्यावे, विशेष म्हणजे नितीश कुमार यांना उपराष्ट्रपती करावे, अशी मागणी भाजपाच्याच एका खासदाराने केली आहे. त्याचे नाव हरिभूषण ठाकूर बचौल असे आहे. हरिभूषण यांच्या या मागणीनंतर आता राजकीय वर्तुळात वेगवेगळ्या चर्चा चालू झाल्या आहेत.

### बिहार विधानसभेत नक्की फायदा !

बिहारमध्ये या वर्षाच्या शेवटपर्यंत विधानसभेची निवडणूक होणार आहे. असे असतानाच आता बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांना उपराष्ट्रपती करावे, अशी मागणी आहे. या मागणीचे आता अनेक अर्थ काढले जात आहेत. नितीश कुमार यांनी मात्र या मागणीवर अद्याप कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. नितीश कुमार ला आणि बिहारला उपराष्ट्रपती पद दिले गेले तर आणायचे बिहारचे मुख्यमंत्रीपद भारतीय जनता पार्टीला मिळू शकेल अशी अटकळ लढवली जात आहे.

### राष्ट्रपती पंतप्रधानांचे आभार..


धनखड यांनी आपला राजीनामा सार्वजनिक केला असून त्यांनी आरोग्याचे कारण सांगत हा राजीनामा दिला असल्याचे म्हटले आहे. त्यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुरमू तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले आहेत. त्यांनी अचानक दिलेल्या या राजीनाम्यानंतर राजकीय वर्तुळात वेगवेगळ्या चर्चांना उधाण आले होते. आता मात्र या पदावर कोणता नेता विराजमान होणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### दोन गोष्टी महत्त्वाच्या..

धनखड यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर आता कोणाची वर्णी लागणार हा मुद्दा अतिशय महत्त्वाचा आहे, त्याचप्रमाणे, त्यांच्या राजीनामे मागे प्रकृती आश्वास त्याचे कारण आहे की दुसरे काय, हे समजून घेणेही इतकेच महत्त्वाचे ठरणार आहे, हे नक्की!

---

## नाम हा परमात्म्याकडे जाण्याचा राजमार्ग



### गुरू आपल्याला अंतिम सुख दाखवितात.

एक लहान मुलगा एका विहिरीजवळ उभा होता. त्याची एक वस्तू आत पडली होती. ' ती काढण्यासाठी मी आत उडी मारतो ' असे तो म्हणू लागला. त्यावर तिथे होता तो एक मनुष्य म्हणाला, ' तू असे करू नकोस, आत पडून बुडून जाशील. ' तरी पण तो ऐकेना, एवढ्यात त्याचा बाप तिथे आला. त्यानेही मुलाला पुष्कळ सांगून पाहिले, पण तो ऐकेना, मग त्या मुलाला बापाने धाक दाखवून आणि मार देऊन घरात नेले. आता, मुलाला मारले म्हणून तुम्ही बापाला दोष द्याल का ? एकुलता एक मुलगा, नवस करून झालेला, त्याला जाऊ दिले असते तर काय झाले असते ? " असे म्हणाल का ? नाही ना ? तर मग गुरू तरी काय करीत असतो ? आपण विषय मागत असतो आणि ते दिले तर आपण त्यात बुडून मरू हे त्याला माहीत असते; म्हणूनच तो आपल्याला त्यातून वाचविण्यासाठी चार गोष्टी सांगून पाहतो. आपण तेही न ऐकले, तर तो आपत्ती वगैरे आणून धाक दाखवितो. आपण त्याबद्दल रडत असलो तरी तो आपल्याला त्यातून वर ओढीतच असतो. आपण तर चांगले शिकले-सवरलेले; त्या मुलाप्रमाणे अज्ञान नसून चांगले वयस्कर; तरीसुद्धा आपल्याला विषयात उडी घ्यावीशी वाटते. गुरूने सांगितले ' लग्न करू नकोस ', तर आपण ' लग्न कधी होईल ' म्हणून त्याच्या पाठीस लागत असतो. आणि शेवटी तर 'गुरूला समजतच नाही' असे म्हणण्यापर्यंत आपली मजल जाते ! सध्या दिसते तेच सुख आपण खरे असे मानीत असतो. पण अंतिम सुख काय, हे गुरूला कळत असते. म्हणून तो सध्या दिसणाऱ्या सुखापासून आपल्याला परावृत्त करीत असतो. तेव्हा, आपण गुरुवचनावर विश्वास ठेवून त्याच्या आज्ञेप्रमाणे वागणे हेच श्रेयस्कर आहे.

तो जे साधन सांगेल तेच करीत राहावे, म्हणजे आपल्याला अंतिम सुखाचा लाभ होईल. गुरू आज्ञा करतो म्हणजे काय करतो ? तर आपले मन जिथे गुंतले असेल तिथून त्याला काढण्याचा तो प्रयत्न करतो. भगवंत भक्ताची संकटे नाहीशी करतो, म्हणजे त्याची प्रापंचिक संकटे दूर करतो असे नाही. ती काय, सहज दूर करता येतात; पण भक्ताला समाधानात ठेवून संकटे सहन करण्याची शक्ती भगवंत देतो. भक्ताला तो नेहमी स्मरणात ठेवतो. असे भक्तच संतपदाला पोहोचतात. एखाद्या विद्वान् माणसाची विद्वता ओळखायला आपण थोडे तरी विद्वान झाले पाहिजे, त्याचप्रमाणे, संत ओळखायला संतांच्या ठिकाणी असणारा गुण थोडा तरी आपल्या ठिकाणी असला पाहिजे. संतांचा मुख्य गुण म्हणजे, ते भक्तीला चिकटलेले असतात. सत्पुरुषांचे बाहेरून वागण्याचे प्रकार त्या त्या देशकालमानाने निरनिराळे असतात, पण आतले भगवंताचे प्रेम मात्र सर्वांचे एकच असते.

**बोधवचन:-** प्रापंचिक जन विषयप्राप्तीसाठी झटतात. पण विषय मागूनही जो देत नाही, त्यापासून परावृत्त करतो, तो संत.

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# फडणवीस यांच्या कार्याची गती अफाट!

## शरद पवारांकडून स्तुतीसुमनं; ठाकरेंकडूनही कौतुक

।मुंबई। प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**देवेंद्र फडणवीस यांच्या कामाचा झपाटा आणि उरक पाहिला की मला मी पहिल्यांदा मुख्यमंत्री झालो तो कार्यकाळ आठवतो. देवेंद्र फडणवीस यांची ही गती ते माझ्या वयाचे होईपर्यंत राहो आणि कालचक्रमानाने ती वृद्धिंगत होत राहो असं अभिष्टचिंतन त्यांच्या वाढदिवसानिमित्त मी करतो असं म्हणत शरद पवार यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर कौतुकाचा वर्षाव केला आहे. एवढंच नाही तर उद्धव ठाकरेंनीही देवेंद्र फडणवीस यांचं कौतुक केलं आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा आज ५५ वा वाढदिवस आहे. या वाढदिवसानिमित्त एका विशेष पुस्तकाचं प्रकाशन करण्यात आलं.**



या पुस्तकात शरद पवारांनी एक लेख लिहून देवेंद्र फडणवीस यांचं कौतुक केलं आहे.क्रियाशील राहण्यासाठी प्रकृती शिडशित असावी असे स्थूलमानाने म्हटले जाते. पण आम्हा दोघांमधील साम्य लक्षात घेता आमच्या कार्यक्षमतेत स्थूलपणा कधी आडवा आला नाही. विनोदाचा भाग सोडला तर त्यांचे कष्ट पाहून ते थकत कसे नाहीत असा प्रश्न मलाही पडतो. ही त्यांच्या कार्याची पोचपावती आहे. देवेंद्र फडणवीसांना राजकारणाचे बाळकडू जरी घरातून मिळाले तरी वडिलांच्या अकाली निधनाच्या धक्क्यातून सावरणं, उभं राहणं आणि नेटाने पुढे जाणं आव्हानात्मक होतं. त्यामुळे आजपर्यंतच्या यशस्वी वाटचालीचे श्रेय केवळ त्यांचे आहे.देवेंद्र फडणवीस कायद्याचे पदवीधर असल्याने ते पट्टीचे हजरजबाबी, संवादकुशल आहेत. वागण्यात आणि बोलण्यात कमालीचे तारतम्य आहे ही त्यांची जमेची बाजू आहे. या गुणांच्या आणि उपजत बुद्धिचातुर्याच्या बळावर त्यांनी सत्तेत नसतानाही आपल्या कार्यक्षमतेचा ठसा उमटवला. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष म्हणून त्यांनी बजावलेली कामगिरी ही खरोखरच वाखाणण्याजोगी होती. या कामगिरीचे फलित म्हणूनच त्यांच्या गळ्यात अगदी तरुण वयात मुख्यमंत्रिपदाची माळ पडली. भाजपाच्या वरिष्ठ नेतृत्वाने दाखवलेला विश्वास त्यांनी सार्थ ठरवला. त्यांनी केलेल्या कामांचा उहापोह कॉफी टेबल बुकमध्ये होईलच. परंतु, मी त्यांच्याकडे विविध विषयांची उत्तम जाण असणारा, प्रशासनावर मजबूत पकड असणारा आणि आधुनिकतेची कास धरणारा नेता म्हणून पाहतो.पूर्वीचे राजकारण आणि आजचे राजकारण फार बदलले आहे. पूर्वी निवडणुकांमध्ये वाद-प्रतिवाद होत, कलगीतुरे रंगत असत. पण निवडणुका संपल्या की सत्ताधाऱ्यांना संरचनात्मक आणि सकारात्मक कार्याकडे, समाजकारणाकडे वळता येई. आजकाल असे होत नाही. राजकारण ही सततची प्रक्रिया झाली आहे. त्यामुळे डाव, प्रतिडाव, कुरघोडी या नित्याच्या बाबी झाल्या आहेत. मतभेदांनी टोक गाठलं आहे. त्यामुळे नकारात्मक प्रतिक्रियात्मक कार्यासाठी उर्जेचा व्यय होतो. त्याचा अनिष्ट परिणाम राज्याच्या दूरगामी धोरणावर आणि जनतेच्या व्यापक हितावर होतो. कौटिल्याने अर्थशास्त्रात राजसत्ता अबाधित राहून तिचा विस्तार व्हावा आणि जनतेचे हित जपावे व जनकल्याणात वृद्धी व्हावी असं सांगितलं आहे. कौटिल्याची योगक्षेम या राजकीय या राजकीय संकल्पनेत राज्यकर्त्यांचे अंतिम ध्येय केवळ राजकीय स्थैर्यप्राप्ती नाही तर जनहित आहे.

### फडणवीस यांच्यावर कौतुकाचा वर्षाव

देवेंद्र यांनी स्वतःला सिद्ध केलं आहे. त्यामुळे राजकीय आखाड्याबाहेरील क्षितिजे अधिकाधिक पार करावीत, अशी माझी अपेक्षा आहे. त्यांच्या हातून व्यापक जनहिताची कार्ये पार पडतील, देशहितासाठी त्यांचं योगदान लाभो याकरिता माझ्या शुभेच्छा आहेत. देवेंद्र फडणवीस महाराष्ट्राची अस्मिता राखण्यासाठी, महाराष्ट्र धर्म वाढवण्यासाठी, महाराष्ट्राची पुरोगामी, विज्ञानवादी आणि सांस्कृतिक परंपरा पुढे नेण्यासाठी अधिक स्वयंभू होवोत.देवेंद्र फडणवीस यांच्या कामाचा झपाटा आणि उरक पाहिला की मला मी पहिल्यांदा मुख्यमंत्री झालो तो कार्यकाळ आठवतो. देवेंद्र फडणवीस यांची ही गती ते माझ्या वयाचे होईपर्यंत राहो आणि कालचक्रमानाने ती वृद्धिंगत होत राहो असं अभिष्टचिंतन त्यांच्या वाढदिवसानिमित्त मी करतो असं म्हणत शरद पवार यांनी देवेंद्र फडणवीस यांच्यावर कौतुकाचा वर्षाव केला आहे.

# सरकार शेतकऱ्यांना एक रुपया देत नाही!

## शासन भिकारी आहे", कोकाटेंच्या वक्तव्यामुळे नवा वाद?

।मुंबई। प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**शेतकऱ्यांच्या पिकविम्याबाबत बोलताना कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी काही महिन्यांपूर्वी एक वादग्रस्त वक्तव्य केलं होतं. त्यावर स्पष्टीकरण करताना कोकाटे यांनी आज आणखी एक वक्तव्य केलं आहे, ज्यामुळे राज्यातील देवेंद्र फडणवीस सरकारची गोची झाली आहे. कोकाटे म्हणाले, "शेतकऱ्यांकडून शासन एक रुपया घेतं. सरकार शेतकऱ्यांना एक रुपया देत नाही. म्हणजे भिकारी कोण आहे? शासन भिकारी आहे, शेतकरी नाही."**



दरम्यान, कोकाटे यांच्या या वक्तव्यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाराजी व्यक्त केली आहे. ते म्हणाले, "मी काही त्यांचं वक्तव्य ऐकलेलं नाही. परंतु, त्यांनी असं वक्तव्य केलं असेल तर ते चुकीचं आहे. कुठल्याही मंत्र्याने असं वक्तव्य करणं चुकीचं आहे. पिकविम्याबाबत अतिशय चुकीची माहिती पसरली गेली आहे."देवेंद्र फडणवीस म्हणाले, "पिकविम्याबाबत आपण काही चांगले निर्णय घेतले आहेत. पिकविम्याची आधीची जी पद्धत होती त्यात शेतकऱ्यांना फायदा होत होता. मात्र, त्याहून अधिक फायदा विमा कंपन्यांचा होत होता. त्यामुळे आम्ही त्या पद्धतीत बदल केले. यासह आम्ही आणखी एक मोठा निर्णय घेतला. राज्याच्या कृषी क्षेत्रात दर वर्षी ५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करण्याचा निर्णय घेण्यात आला. पाच वर्षांत आपलं सरकार राज्याच्या कृषी क्षेत्रात २५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. यामुळे कृषी क्षेत्राला मोठा फायदा होईल.""एखाद्या मंत्र्याने असं वक्तव्य करणं योग्य नाही. मी आजही सांगतो की देशातील इतर राज्यांच्या तुलनेत आपली अर्थव्यवस्था चांगली आहे. मी असं म्हणत नाही की आपली अर्थव्यवस्था सर्वात चांगली आहे किंवा आपण श्रीमंत आहोत, आपल्याकडे खूप पैसा आहे.

### मुख्यमंत्री काय म्हणाले?

असं मी म्हणणार नाही. मात्र, देशातील जी विकसनशील राज्ये आहेत त्यांच्या तुलनेत आपली स्थिती नक्कीच चांगली आहे. मान्य आहे की आपल्यापुढे खूप आव्हानं आहेत. मात्र, आपल्या राज्याची वित्तीय तूट ही आम्ही सातत्याने तीन टक्क्यांहून कमी ठेवली आहे. मात्र देशातील अनेक राज्यांची वित्तीय तूट चार किंवा पाच टक्क्यांच्या आसपास आहे. तसेच कर्जाच्या बाबतीत अनेक राज्ये २५ टक्क्यांच्या पुढे आहेत. महाराष्ट्राची तशी अवस्था नाही."मुख्यमंत्री म्हणाले, "आपलं सरकार जनतेच्या कल्याणाचं काम करत आहे आणि करत राहील."शेतकऱ्यांच्या पिकविम्याबाबत बोलताना कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी काही महिन्यांपूर्वी एक वादग्रस्त वक्तव्य केलं होतं. त्यावर स्पष्टीकरण करताना कोकाटे यांनी आज आणखी एक वक्तव्य केलं आहे, ज्यामुळे राज्यातील देवेंद्र फडणवीस सरकारची गोची झाली आहे. कोकाटे म्हणाले, "शेतकऱ्यांकडून शासन एक रुपया घेतं.

# न्यायालयात येण्याचीही हिंमत नाही का?

## सीबीआयला न्यायालयाने फटकारले; पुढील सुनावणी 30 जुलैला

**। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**इंडियाबुल्स हाऊसिंग फायनान्स लिमिटेड विरुद्धच्या खटल्याच्या सुनावणीला हजर न राहिल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने केंद्रीय अन्वेषण विभागाला (CBI) फटकारले आहे. "आम्ही या वर्तनाचे कौतुक करणार नाही. एकदा आम्ही नोटीस बजावली की त्यांना येथे यावे लागते. ते सर्वोच्च न्यायालयात हजर राहणार नाहीत, असे कसे म्हणू शकतात?" असे खंडपीठाने म्हटले.**

इंडियाबुल्स हाऊसिंग फायनान्स लिमिटेड, ज्याला आता सन्मान कॅपिटल लिमिटेड म्हणून ओळखले जाते, यांच्या प्रवर्तकांनी निधीचा अपव्यय केल्याच्या गंभीर आरोपांची एसआयटीमार्फत न्यायालयाच्या देखरेखीखाली चौकशी करण्याच्या दिल्ली उच्च न्यायालयाच्या आदेशाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू होती.



याचिकाकर्त्याकडून वकील प्रशांत भूषण यांनी असे म्हटले की, "अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) म्हटले आहे की, कोणताही पूर्वनियोजित गुन्हा नसल्याने ते कारवाई करण्यास असमर्थ आहेत. सीबीआय ला गुन्हा नोंदवण्याची विनंती करणारा अर्ज दाखल करण्यात आला होता."न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने असे निरीक्षण नोंदवले की, आरोपांच्या स्वरूपामुळे केंद्रीय संस्थांनी चौकशी आणि अहवाल सादर करणे आवश्यक आहे. "हे आरोप फसवणुकीचे आहेत. निष्पक्षपणे, केंद्रीय संस्थांनी चौकशी करून अहवाल सादर करायला हवा होता," असे न्यायालयाने म्हटले. यावेळी सीबीआय ला नोटीस बजावण्यात आल्याचे लक्षात येताच न्यायालयाने म्हटले की,"त्यांच्यात न्यायालयात येण्याची हिंमतही नाही?"यावेळी अतिरिक्त सॉलिसिटर जनरल यांनी एक आठवड्याचा वेळ मागितला, जो न्यायालयाने मंजूर केला. खंडपीठाने आठवण करून दिली की, सीबीआय ला कारवाई करण्यासाठी औपचारिक तक्रारदाराची आवश्यकता नाही. "त्यांना आणखी कोणती माहिती हवी आहे? त्यांच्याकडे आधीच रेकॉर्ड आहेत", असे न्यायालयाने म्हटले.इंडियाबुल्सचे वकील मुकुल रोहतगी यांनी दाव्यांना विरोध केला की, कंपनी वर्षानुवर्षे अस्तित्वात आहे आणि तिच्याविरुद्ध एकही तक्रार आलेली नाही. या प्रकरणाची पुढील सुनावणी आता ३० जुलै रोजी होईल. फायनान्स लिमिटेड, ज्याला आता सन्मान कॅपिटल लिमिटेड म्हणून ओळखले जाते, यांच्या प्रवर्तकांनी निधीचा अपव्यय केल्याच्या गंभीर आरोपांची एसआयटीमार्फत न्यायालयाच्या देखरेखीखाली चौकशी करण्याच्या दिल्ली उच्च न्यायालयाच्या आदेशाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरू होती. याचिकाकर्त्याकडून वकील प्रशांत भूषण यांनी असे म्हटले की, "अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) म्हटले आहे की, कोणताही पूर्वनियोजित गुन्हा नसल्याने ते कारवाई करण्यास असमर्थ आहेत. सीबीआय ला गुन्हा नोंदवण्याची विनंती करणारा अर्ज दाखल करण्यात आला होता."न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने असे निरीक्षण नोंदवले की, आरोपांच्या स्वरूपामुळे केंद्रीय संस्थांनी चौकशी आणि अहवाल सादर करणे आवश्यक आहे. फसवणुकीचे आहेत. निष्पक्षपणे, केंद्रीय संस्थांनी चौकशी करून अहवाल सादर करायला हवा होता," असे न्यायालयाने म्हटले. यावेळी सीबीआय ला नोटीस बजावण्यात आल्याचे लक्षात येताच न्यायालयाने म्हटले की, "त्यांच्यात न्यायालयात येण्याची हिंमतही नाही?

### या वर्तनाचे कौतुक करणार नाही

"यावेळी अतिरिक्त सॉलिसिटर जनरल यांनी एक आठवड्याचा वेळ मागितला, जो न्यायालयाने मंजूर केला. खंडपीठाने आठवण करून दिली की, सीबीआय ला कारवाई करण्यासाठी औपचारिक तक्रारदाराची आवश्यकता नाही. "त्यांना आणखी कोणती माहिती हवी आहे? त्यांच्याकडे आधीच रेकॉर्ड आहेत", असे न्यायालयाने म्हटले.इंडियाबुल्सचे वकील मुकुल रोहतगी यांनी दाव्यांना विरोध केला की, कंपनी वर्षानुवर्षे अस्तित्वात आहे आणि तिच्याविरुद्ध एकही तक्रार आलेली नाही. या प्रकरणाची पुढील सुनावणी आता ३० जुलै रोजी होईल.इंडियाबुल्स हाऊसिंग फायनान्स लिमिटेड विरुद्धच्या खटल्याच्या सुनावणीला हजर न राहिल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने केंद्रीय अन्वेषण विभागाला (CBI) फटकारले आहे. "आम्ही या वर्तनाचे कौतुक करणार नाही.

# आम्ही तुमची अर्थव्यवस्था उद्ध्वस्त करू!

## लिंडसे ग्रॅहम यांनी रशियाकडून तेल आयात करणाऱ्या देशांना इशारा दिला

**। नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**अमेरिकन रिपब्लिकन सिनेटर लिंडसे ग्रॅहम यांनी रशियाकडून तेल आयात करणाऱ्या देशांना इशारा दिला आहे. ते म्हणाले, "चीन, भारत व ब्राझीलला अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या व्यापार कारवाईचा सामना करावा लागू शकतो. ट्रम्प हे रशियाकडून तेल खरेदी करणाऱ्या देशांवर आयात शुल्क लावणार आहेत. यामध्ये चीन, भारत व ब्राझीलसह इतर काही देशांचा समावेश आहे." रशिया जितकं तेल निर्यात करतो, त्यापैकी ८० टक्के वाटा केवळ या तीन देशांचा आहे.**

डोनाल्ड ट्रम्प यांच्या कारवाईचं समर्थन करत व त्याची कारणं





सांगत ग्रॅहम म्हणाले की या "देशांचा रशियाबरोबर चालू असलेला हा व्यापार व्लादिमीर पुतिन यांच्या युद्धखोरीला चालना देतो. जग युक्रेनमधील संघर्ष थांबवण्याचा प्रयत्न करत असताना चीन, भारत व ब्राझीलसारखे देश रशियाला अप्रत्यक्षपणे मोठं करत आहेत." लिंडसे ग्रॅहम एवढंच बोलून थांबले नाहीत.

ते म्हणाले, "भारत, चीन व ब्राझील या देशांनी रशियन तेल खरेदी करणं चालू ठेवलं तर आम्ही त्यांच्या अर्थव्यवस्थेची वाट लावू." लिंडसे फॉक्स न्यूजशी बोलत होते.अमेरिकन रिपब्लिकन सिनेटर म्हणाले, "भारत, चीन व ब्राझील या देशांना मी इतकंच सांगेन की त्यांनी रशिया-युक्रेन युद्ध चालू ठेवण्यासाठी किफायतशीर रशियन तेल खरेदी करणं चालू ठेवलं तर आम्ही तुम्हाला उद्ध्वस्त करू. कारण तुम्ही जे पैसे वाचवत आहात ते रक्ताने माखलेले आहेत."ट्रम्प प्रशासन निर्णायक कारवाई करण्यास सज्ज आहे. तसेच आमच्या अध्यक्षांनी पुतिन यांना त्यांची लष्करी कारवाई थांबवण्यासाठी ५० दिवसांचा अल्टीमेटम दिला आहे. अन्यथा रशियाला कठोर निर्बंधांचा सामना करावा लागेल. यामध्ये तेलाच्या खरेदीपासून रशियन अर्थव्यवस्थेला सहाय्य करणाऱ्या देशांवरील दंडात्मक कारवाईचाही समावेश आहे.

### सिनेटरचा भारताला इशारा

डोनाल्ड ट्रम्प हे अमेरिकन राजकारण व परराष्ट्र धोरणांमधील स्कॉटी शेफलर (दिग्गज अमेरिकन गोल्फपटू) आहेत, ते तुम्हाला पूर्णपणे हरवतील."रशियाकडून तेल खरेदी करणाऱ्या देशांवर ५०० टक्के आयात शुल्क (टॅरिफ) लागू करण्याचा प्रस्ताव अमेरिकेच्या सिनेटमध्ये प्रलंबित आहे. ग्रॅहम यांच्या या वक्तव्याकडे ट्रम्प प्रशासनाच्या परदेशी व्यापार व युद्धकाळातील निधीबाबतची आक्रमक भूमिका म्हणून पाहिलं जात आहे.डोनाल्ड ट्रम्प यांच्या कारवाईचं समर्थन करत व त्याची कारणं सांगत ग्रॅहम म्हणाले की या "देशांचा रशियाबरोबर चालू असलेला हा व्यापार व्लादिमीर पुतिन यांच्या युद्धखोरीला चालना देतो. जग युक्रेनमधील संघर्ष थांबवण्याचा प्रयत्न करत असताना चीन,भारत व ब्राझीलसारखे देश रशियाला अप्रत्यक्षपणे मोठं करत आहेत." लिंडसे ग्रॅहम एवढंच बोलून थांबले नाहीत.

# सोहेलला राजेश खन्ना यांचे खरेदी करायचे होते



राजेश खन्ना यांचे स्टारडम जबरदस्त होते. त्यांना भारताचे पहिले सुपरस्टार म्हटले जात असे. त्यांनी सलग १७ सुपरहिट चित्रपट दिले, जे क्वचितच कोणी तोडू शकेल. राजेश खन्ना यांनी प्रसिद्धीबरोबरच भरपूर संपत्तीही मिळवली. दुर्दैवाने, ते जितके वर आले त्यापेक्षा जास्त वेगाने ते खाली पडले. एक वेळ अशी आली की त्यांच्यावर कर्जाचे ओझे होते. आयुष्याच्या शिखरावर असताना मित्रांना महागड्या भेटवस्तू देणारे राजेश खन्ना शेवटच्या काही वर्षांत आर्थिक संकटाशी झुंजत होते. अफवा पसरल्या होत्या की त्यांना कार्टर रोडवरील आशीर्वाद येथील त्यांचा बंगला विकायचा आहे, पण जेव्हा सोहेल खानने बंगला खरेदी करण्याची इच्छा व्यक्त केली, तेव्हा काकांनी त्यांच्या मॅसेंजर म्हणून आलेल्या स्क्रीनराइटर रूमी जाफरी यांना काय उत्तर दिले? चला जाणून घेऊया.राजेश खन्ना यांच्या आर्थिक परिस्थितीबद्दलच्या अफवा आणि अटकळ पसरू लागल्यावर अभिनेता 'आशीर्वाद' विकण्याची शक्यता असल्याच्या चर्चाही सुरू झाल्या. त्यांना सलमान खानचा धाकटा भाऊ सोहेलने खरेदी करण्याची ऑफर दिली होती. राजेश खन्ना यांचे चरित्र 'डार्क स्टार: द लोनलेनेस ऑफ बीइंग राजेश खन्ना'मध्ये एका ठिकाणी त्यांच्या आर्थिक परिस्थितीचा उल्लेख आहे. पुस्तकात असे लिहिले आहे की, त्यांची आर्थिक परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत चालली होती, त्यानंतर अशी चर्चा होती की ते त्यांचे आशीर्वाद घर विकण्यास तयार आहेत. या अफवांचे खरेपण कोणालाही माहीत नव्हते, पण राजेश खन्ना काळजीत दिसत असल्याने लोक त्यावर विश्वास ठेवत होते. आयकर विभागाने सुमारे १.५ कोटी रुपयांची नोटीस बजावल्याची बातमी आली, ज्यामुळे लोक अफवांना खरे मानू लागले होते.स्क्रीनराइटर रूमी जाफरी यांना लक्षात आहे .

# अंकिताचं पतीबरोबर सेटवर कडाक्याचं भांडण



'पवित्र रिश्ता' फेम अभिनेत्री अंकिता लोखंडे व तिचा पती विकी जैन सध्या 'लाफ्टर शेफ्स २' मध्ये झळकत आहेत. शोमध्ये विकी व अंकिता एकमेकांवर अनेकदा चिडत असतात. दोघांच्या कुरबुरी होत असतात. लहान लहान कारणांवरून वाद होतात. एका ताज्या एपिसोडच्या शूटिंगदरम्यान पुन्हा विकी व अंकिताचं सेटवर भांडण झाल्याची माहिती समोर आली आहे. एक पदार्थ बनवताना अंकिता व विकीचं भांडण झालं. झालं असं की अंकिता तो पदार्थ योग्य पद्धतीने बनवत नाहीये, असं विकीला वाटलं. त्यामुळे तो अंकिताला वैतागला आणि तिच्यावर भडकला. इ-टाइम्सने यासंदर्भात वृत्त दिलंय. चिडलेला विकी अंकिताला म्हणाला, "वेडी झाली आहेस तू." पतीचं हे म्हणणं अंकिताला अजिबात आवडलं नाही आणि ती त्याच्यावर संतापली आणि त्याला "वेडा कुठला," असं म्हणाली. यानंतर विकीने अंकिताला विचारलं की ती त्याला वेडा का म्हणत आहे. त्यावर अंकिता म्हणाली, "तू आधी मला वेडी म्हणालास. मी बोलले नाही." अंकिता व विकीचं भांडण इथेच थांबलं नाही. विकी अंकिताला म्हणाला, "इतकं हायपर व्हायची खरंच गरज आहे का?" त्यावर अंकिता म्हणाली, "मी नाही तूच हायपर होत आहेस." मग विकी अंकिताला म्हणतो की तू चुकीचं वागतेय. विकी व अंकिताची अशी भांडणं या शोमध्ये होतंच असतात. याआधीच्या एपिसोडमध्ये दोघांनी ते लवकरच त्यांच्या पहिल्या बाळाचं स्वागत करणार आहेत, असं म्हटलं होतं. हे ऐकून सेटवरील सर्वांना आश्चर्याचा धक्का बसला होता. पण नंतर मात्र याबद्दल बऱ्याच दिवसांपासून बातम्या येत असल्याचं म्हणत गरोदर नसल्याचं अंकिताने स्पष्ट केलं होतं.

# गोरी नसल्याने नकार मिळाला

रंग, रुप, दिसणं हे कलाविश्वात काही प्रमाणात का असेना पण महत्त्वाचं ठरतं. त्यामुळे अनेकदा काही कलाकारांना नकार मिळत असल्याचं पाहायला मिळतं. अशातच आता लोकप्रिय बॉलीवूड अभिनेत्रीने तिच्या रंगामुळे तिला नकार मिळाल्याबाबत सांगितलं आहे. बॉलीवूड अभिनेत्री म्हटलं की पहिला शब्द आठवतो तो म्हणजे ग्लॅमरस. त्यामुळे रंग रुपावरून नकार मिळाल्याचं यापूर्वीसुद्धा कलाकार सांगताना दिसले. आता बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्रीने असाच काहीसा प्रकार तिच्यासह घडल्याचं सांगितलं आहे. अलीकडेच वादाच्या भोवऱ्यात सापडलेल्या 'अबीर गुलाल' या चित्रपटामुळे चर्चेत आलेली अभिनेत्री वाणी कपूरने तिला आलेल्या अनुभवाबद्दल सांगितलं आहे.वाणी कपूरने रंगामुळे तिला नकार मिळाला असल्याचं सांगितलं आहे. 'न्यूज १८'ला दिलेल्या मुलाखतीमध्ये ती म्हणाली, "एका चित्रपटनिर्मात्याने एका भूमिकेसाठी मला मी रंगाने तितकी गोरी नसल्याने नाकारलं होतं." पुढे अभिनेत्रीने तिला तिच्या शरीरयष्टीमुळेसुद्धा अनेकदा बोललं गेलं असल्याचं सांगितलं आहे.

# ऐश्वर्या सावलीची माफी मागणार?



'सावळ्याची जणू सावली' ही झी मराठी वाहिनीवरील लोकप्रिय मालिका आहे. या मालिकेतील सारंग व सावली त्यांच्या प्रेमळ स्वभावामुळे प्रेक्षकांच्या मनावर राज्य करताना दिसतात. मर्जीविरुद्ध लग्न झाल्यामुळे सारंगला सावलीबरोबरचे लग्न स्वीकारण्यास वेळ गेला. पण, कालातरांने त्यांच्यात मैत्री झाली आणि सारंग सावलीच्या प्रेमात पडला. सावलीनेदेखील तिच्या चांगल्या स्वभावामुळे आणि गोड वागण्याने घरातील इतरांची मने जिंकली. सारंगची आई तिलोत्तमा आणि सावली यांच्यात अजूनही अंतर असल्याचे दिसते, कारण सावलीने धोका देऊन सारंगशी लग्न केल्याचे तिचे म्हणणे आहे. याबरोबरच सावली सावळ्या रंगाची आहे सावळ्या किंवा काळ्या रंगाची माणसे, वस्तू यांचा तिला तिरस्कार आहे. या सगळ्यात सारंगची वहिनी ऐश्वर्या सतत सावलीविरुद्ध कारस्थान करताना दिसते.

# 'राजा शिवाजी' चित्रपटात असणार विद्या बालन

मराठीसह हिंदी सिनेसृष्टीतून आपल्या अभिनयाने प्रेक्षकांना वेड लावणारा अभिनेता म्हणजे रितेश देशमुख. अभिनेता असण्याबरोबरच रितेश दिग्दर्शकसुद्धा आहे. वेड हा पहिला मराठी चित्रपट त्याने दिग्दर्शित केला आणि या चित्रपटाला प्रेक्षकांकडून चांगलाच प्रतिसाद मिळाला. अशातच आता रितेश दिग्दर्शक म्हणून लवकरच छत्रपती शिवाजी महाराजांच्या आयुष्यावर आधारित 'राजा शिवाजी' हा चित्रपट घेऊन प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे.

काही दिवसांपूर्वी रितेशने या चित्रपटाची घोषणा करीत त्यामधील कलाकारांची नावे जाहीर केली होती. या चित्रपटात संजय दत्त, अभिषेक बच्चन, महेश मांजरेकर, सचिन खेडेकर, भाग्यश्री, फरदीन खान, जितेंद्र जोशी, अमोल गुप्ते, जिनिलीया देशमुखसह अभिनेत्री विद्या बालनही असणार आहे. नुकत्याच एका मुलाखतीत विद्याने तिच्या 'राजा शिवाजी' चित्रपटामधील भूमिकेबद्दलचा आणि रितेशबरोबरच्या कामाचा अनुभव शेअर केला.'द हॉलीवूड रिपोर्टर इंडिया'ला दिलेल्या मुलाखतीत विद्या म्हणाली, "हो! मी नुकतंच त्या चित्रपटाचं चित्रीकरण पूर्ण केलं. तो चित्रपट छत्रपती शिवाजी महाराजांवर आधारित आहे; पण आता मी त्याबद्दल आणि भूमिकेबद्दल जास्त काही बोलू शकत नाही. हा अनुभव खूपच कमाल होता. मी रितेशबरोबर 'हे बेबी'मध्ये म्हणून काम केलं आहे आणि त्यातील त्याचा विनोदी अभिनय खूपच कमाल होता.

# विराटने मला त्याचा नंबर दिला!

## हसीब हमीद याने कोहलीबाबत मोठा खुलासा

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय संघाचा स्टार फलंदाज विराट कोहली कसोटी संघात नसला तरी त्याची चर्चा मात्र प्रत्येकवेळेस होते. विराटने इंग्लंड दौऱ्यापूर्वी कसोटी संघातून निवृत्ती घेतली होती. सामन्यातील क्षण, विक्रम या व अशा अनेक मुद्द्यांवरून विराट कोहली आजही चर्चेचा विषय असतो. यादरम्यान इंग्लंडचा खेळाडू हसीब हमीद याने विराट कोहलीबाबत मोठा खुलासा केला आहे. इंग्लंडचा क्रिकेटपटू हसीब हमीद सध्या उत्तम फॉर्ममध्ये आहे. काऊंटी चॅम्पियनशिपमध्ये तो धमाकेदार कामगिरी करत आहे.**




नॉटिंगहॅमशायर संघाचा कर्णधार असलेल्या हसीबने खुलासा केला आहे की तो चांगली कामगिरी करत आहे पण त्याचं श्रेय विराट कोहलीलाही जातं. हसीब हमीदने एका मुलाखतीत खुलासा केला की विराट कोहलीने त्याला खूप मदत केली आहे. फलंदाजीबद्दल त्याला जे काही प्रश्न होते त्याची उत्तरं विराटने दिली.हसीब अहमदने सांगितलं की विराट कोहलीने मला स्वत:चा फोन नंबर दिला आणि जेव्हा गरज असेल तेव्हा कॉल कर असही तो म्हणाला. विराटने हसीब हमीदला कशी मदत केली याबाबत सांगताना तो म्हणाला, "विराट कोहली नेहमीच खूप मदत केली आहे. जेव्हा जेव्हा मला फलंदाजीबद्दल काही प्रश्न विचारायचा असेल तेव्हा तो मदत करत असे. मी त्याचा खूप आदर करतो. त्याने कठीण काळात मला फार पाठिंबा दिला आहे. विराटने मला त्याचा नंबर दिला आणि सांगितलं तुला काही मदत लागली तर बिनधास्त कॉल कर. यावरूनच तो किती कमालीचा माणूस आहे याचा अंदाज येतो", असं हमीदने सांगितलं.हसीब हमीदने २०१६ मध्ये कसोटी पदार्पण केले, पण २०२२ पासून तो इंग्लंड संघाबाहेर आहे. उजव्या हाताच्या या फलंदाजाने १० सामन्यांमध्ये ४३९ धावा केल्या, ज्यामध्ये ४ अर्धशतकांचा समावेश आहे. हमीदची सरासरी फक्त २४.३८ होती आणि म्हणूनच त्याला इंग्लंड संघातून वगळण्यात आले. पण मोठी गोष्ट म्हणजे, जेव्हा तो इंग्लंड संघात आला तेव्हा तो फक्त १९ वर्षांचा होता. आता हा खेळाडू २८ वर्षांचा आहे आणि त्याच्या फलंदाजीतही सुधारणा झाली आहे. त्याने काउंटी चॅम्पियनशिपमध्येही याचा पुरावा दिला आहे.हसीब हमीद २०२५ च्या काउंटी चॅम्पियनशिप डिव्हिजन वनमध्ये नॉटिंगहॅमशायरचे नेतृत्व करत आहे आणि त्याने ७०.६६ च्या सरासरीने ८४८ धावा केल्या आहेत. हमीदने एक द्विशतक आणि एक शतक झळकावलं आहे. ज्यामध्ये १२१ चौकारांचा समावेश आहे.नॉटिंगहॅमशायर संघाचा कर्णधार असलेल्या हसीबने खुलासा केला आहे की तो चांगली कामगिरी करत आहे पण त्याचं श्रेय विराट कोहलीलाही जातं. हसीब हमीदने एका मुलाखतीत खुलासा केला की विराट कोहलीने त्याला खूप मदत केली आहे. फलंदाजीबद्दल त्याला जे काही प्रश्न होते त्याची उत्तरं विराटने दिली.हसीब अहमदने सांगितलं की विराट कोहलीने मला स्वत:चा फोन नंबर दिला आणि जेव्हा गरज असेल तेव्हा कॉल कर असही तो म्हणाला. विराटने हसीब हमीदला कशी मदत केली याबाबत सांगताना तो म्हणाला, "विराट कोहली नेहमीच खूप मदत केली आहे. जेव्हा जेव्हा मला फलंदाजीबद्दल काही प्रश्न विचारायचा असेल तेव्हा तो मदत करत असे. मी त्याचा खूप आदर करतो. त्याने कठीण काळात मला फार पाठिंबा दिला आहे.

### विराट कमालीचा माणूस आहे

विराटने मला त्याचा नंबर दिला आणि सांगितलं तुला काही मदत लागली तर बिनधास्त कॉल कर. यावरूनच तो किती कमालीचा माणूस आहे याचा अंदाज येतो", असं हमीदने सांगितलं.हसीब हमीदने २०१६ मध्ये कसोटी पदार्पण केले, पण २०२२ पासून तो इंग्लंड संघाबाहेर आहे. उजव्या हाताच्या या फलंदाजाने १० सामन्यांमध्ये ४३९ धावा केल्या, ज्यामध्ये ४ अर्धशतकांचा समावेश आहे. हमीदची सरासरी फक्त २४.३८ होती आणि म्हणूनच त्याला इंग्लंड संघातून वगळण्यात आले. पण मोठी गोष्ट म्हणजे, जेव्हा तो इंग्लंड संघात आला तेव्हा तो फक्त १९ वर्षांचा होता. आता हा खेळाडू २८ वर्षांचा आहे आणि त्याच्या फलंदाजीतही सुधारणा झाली आहे. त्याने काउंटी चॅम्पियनशिपमध्येही याचा पुरावा दिला आहे.हसीब हमीद २०२५ च्या काउंटी चॅम्पियनशिप डिव्हिजन वनमध्ये नॉटिंगहॅमशायरचे नेतृत्व करत आहे आणि त्याने ७०.६६ च्या सरासरीने ८४८ धावा केल्या आहेत. हमीदने एक द्विशतक आणि एक शतक झळकावलं आहे.

# हार्दिक -जास्मिन वालियाचे ब्रेकअप?

## हार्दिक -जास्मिनने एकमेकांना इन्स्टाग्रामवर अनफॉलो केलं

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारताचा अष्टपैलू क्रिकेटपटू हार्दिक पंड्या पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. हार्दिक पंड्या आणि नताशा स्टँकोविक यांचा घटस्फोट झाल्यानंतर हार्दिक पंड्याचं नाव ब्रिटिश-भारतीय अभिनेत्री, गायिका जास्मिन वालिया हिच्याबरोबर जोडलं जात होतं. पण आता या दोघांचा ब्रेकअप झाल्याची चर्चा सुरू आहे.**



असल्याच्या अफवा बऱ्याच काळापासून सुरू आहेत. पण, दोघांनीही हे नातं कधीच सार्वजनिकरित्या स्वीकारलं नाही. सोशल मीडियावर एकत्र दिसणाऱ्या पोस्ट कधीकधी त्यांच्यातील जवळीक दर्शवत होत्या. पण पोस्टमध्येही त्यांनी एकमेकांचा स्पष्ट उल्लेख कधीच केला नाही.हार्दिक आणि जास्मिन यांच्या डेटिंगच्या चर्चांदरम्यान या दोघांचा ब्रेकअप झाल्याचं म्हटलं जात आहे. दोघांनीही एकमेकांना इन्स्टाग्रामवर अनफॉलो केलं आहे, ज्यामुळे या दोघांचं नातं तुटल्याची चर्चा सोशल मीडियावर सुरू आहे.आयपीएलदरम्यान जास्मिन वालिया मुंबई इंडियन्सचे जवळपास सर्वच सामने पाहण्यासाठी स्टेडियममध्ये उपस्थित होती.

### कोण आहे जास्मिन वालिया?

मुंबई इंडियन्सच्या सामन्यांमध्ये ती हार्दिक पंड्या आणि संघाला चिअर करतानाचे फोटो, व्हीडिओही व्हायरल झाले होते. इतकंच नव्हे तर तिला मुंबई इंडियन्सच्या टीम बसमध्ये जातानाही पाहिलं गेलं. वृत्तानुसार, जास्मिन त्याच टीम बसमधून प्रवास करत होती जी खेळाडूंच्या कुटुंबांसाठी, त्यांच्या पत्नी आणि कुटुंबातील सदस्यांसाठी असते. यावरून हो दोघेही डेट करत असल्याच्या चर्चांना अधिक उधाण आलं.जास्मिन वालिया ही एक गायिका आणि अभिनेत्री आहे. तिने इंग्रजी, पंजाबी आणि हिंदी अशा अनेक भाषांमध्ये गायक म्हणून आपली ओळख निर्माण केली आहे. तिच्या गाण्यांमुळे ती विशेषतः दक्षिण आशियाई संगीत इंडस्ट्रीमध्ये प्रसिद्ध आहे. २०१७ मध्ये तिचं बॉम डिगी हे गाणं रिलीज झालं. या गाण्यामुळे जास्मिन वालिया अधिक प्रसिद्धीझोतात आली. जास्मिनने हे गाणं ब्रिटिश-पाकिस्तानी गायक झॅक नाईट याच्याबरोबर गायलं होतं. बॉलीवूड चित्रपट 'सोनू के टिटू की स्वीटी' या चित्रपटातील हे गाणं आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। बुधवार ।

। दि. 23 जुलै 2025 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## हिंजवडी आयटी पार्क ‘कोंडीमुक्त’ करण्यासाठी

# अतिरिक्त ‘वॉर्डन’ नियुक्ती करणार!

### विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार : आढावा बैठकीत विविध विभागांकडून विकासकामांना गती






**। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**हिंजवडी आयटी पार्कमधून पुणे- पिंपरी-चिंचवड व ग्रामीण भागासह मुंबई- बंगळुरू महामार्गावर इन-आउटच्या ठिकाणी होणारी वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी आवश्यकतेनुसार अतिरिक्त वॉर्डन नियुक्ती करण्याची मागणी वाहतूक पोलीस प्रशासनाने करावी. त्यासाठी ‘पीएमआरडीए’ने मनुष्यबळ उपलब्ध करावे, असे आदेश विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी दिले आहेत.**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या निर्देशानुसार, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांनी हिंजवडी आयटी पार्क आणि परिसर वाहतूक कोंडीमुक्त करण्यासाठी आज आढावा बैठक घेतली. यावेळी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, ‘पीएमआरडीए’चे महानगर आयुक्त योगेश म्हसे यांच्यासह महावितरण, एमआयडीसी, पीएमआडीए, जिल्हा प्रशासन, प्रदूषण नियंत्रण महामंडळ, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, पुणे प्रादेशिक परिवहन महामंडळ आदी शासकीय अस्थापनांचे अधिकारी उपस्थित होते.

भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने आयटी फोरम, विविध सोसायटी फेडरेशनचे प्रतिनिधी आणि लोकप्रतिनिधी यांची नुकतीच मुंबई येथे विधानभवनमध्ये बैठक झाली होती. त्यावेळी हिंजवडी आणि परिसराच्या पायाभूत सोयी-सुविधा सक्षम करण्यासाठी “सिंगल पॉईंट ॲथॉरिटी” निश्चित केली. त्यानंतर 15 दिवसांतून एकदा आढावा बैठक घेण्याचे आदेश दिले आहे.

दरम्यान, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आणि पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत प्रशासनाने अतिक्रमण विरोधी कारवाई सुरू केली. वाहतुकीला अडथळा ठरणारी बांधकामे, पत्राशेड हटवण्याची धडक मोहीम हाती घेतली. त्यानंतर आता रस्ते प्रशस्त करण्याच्या

### विभागीय आयुक्तांनी केलेल्या सूचना...

1. प्रशासकीय कामांना दिरंगाई होत असेल, तर अधिकाऱ्यांनी आपल्या स्तरावर ‘ॲक्शन प्लॅन’ तयार करावा.
2. वाहतूक वॉर्डन मागणी केल्यानुसार, पीएमआरडीए उपलब्ध करुन देईल. पुणे आणि पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तांनी तशी मागणी करावी.
3. महावितरणचे ट्रान्स्फार्मर आणि ओव्हर हेड वायर वाहतुकीला अडथळा ठरत असतील, तर ते स्थलांतरीत करणे.
4. वाहतूक समस्या निर्माण होणाऱ्या ठिकाणी आवश्यकतेनुसार ऐकेरी वाहतूक व्यवस्था करणे.
5. भूसंपादनाचे काम गतीमान करावे. शेतकऱ्यांना विश्वासात घेणे आणि रस्त्याची जागा ताब्यात घेणे.
6. पीएमपीएमएल बस थांबे योग्य ठिकाणी निश्चित करणे.

“हिंजवडी आयटी पार्क” ची कोंडी सोडवण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी “सिंगल पॉईंट ॲथॉरिटी” निश्चित केली. सर्व शासकीय विभागांमधील समन्वय हा खूप महत्त्वाचा होता. वाहतुकीला अडथळा ठरणारी अनधिकृत बांधकामे आणि पत्राशेडवर प्रशासनाने कारवाई केली. त्यामुळे रस्ते प्रशस्त होतील. बेघर झालेल्या नागरिकांना हक्काचे घर देण्याची भूमिका प्रशासनाने ठेवावी. यासोबत भूसंपादनाच्या कामाला गती द्यावी. पायाभूत सोयी-सुविधा सक्षम करणे आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण संबंधित कामे मार्गी लावण्यासाठी ‘ॲक्शन प्लॅन’ तयार करावा, अशी मागणी आहे.

**–महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

# मोशी परिसरात वृक्षारोपण मोहीम उत्साहात!

## प्रा. कविता आल्हाट यांचा पुढाकार : उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसाचे निमित्त

। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री मा. अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त पिंपरी-चिंचवड शहर महिला राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षा प्रा.कविता आल्हाट यांच्या वतीने मोशी परिसरातील विविध सोसायट्यांमध्ये वृक्षारोपण मोहीम राबवण्यात आली.**




या उपक्रमात महिलांसह ज्येष्ठ नागरिक आणि युवकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. यावेळी गुलमोहोर, अशोक, बदाम, सप्तपर्णी, पिंपळ, करंज अशा विविध जातींची झाडे प्रभागातील सोसायट्यांच्या आवारात लावण्यात आली. प्रत्येक सोसायटीतील नागरिकांनी उस्फूर्त सहभाग दर्शवून झाडांचे संगोपन करण्याची जबाबदारी स्वीकारली. कार्यक्रमात बोलताना प्रा. कविता आल्हाट म्हणाल्या, “वृक्ष हे जीवनाचे आधार आहेत. प्रदूषण वाढत असताना झाडे लावणे आणि त्यांचे संगोपन करणे ही काळाची गरज आहे. प्राणवायूचा स्रोत असलेल्या झाडांचे संवर्धन ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. स्वच्छ, सुंदर आणि हिरवा प्रभाग घडवण्यासाठी नागरिकांनी पुढाकार घ्यावा.”

### पर्यावरणपूरक उपक्रमामुळे आदर्श...

या उपक्रमामुळे परिसरातील नागरिकांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण झाली आहे. सोसायट्यांमधील लहान मुलांपासून ते ज्येष्ठांपर्यंत सर्वांनी हसतमुखाने सहभाग घेतल्यामुळे कार्यक्रमात उत्साहाचे वातावरण होते. या वृक्षारोपण उपक्रमात स्थानिक सामाजिक कार्यकर्ते, महिला मंडळांच्या सदस्य, युवक मंडळाचे प्रतिनिधी आणि विविध सोसायट्यांचे पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल प्रा. कविता आल्हाट व त्यांच्या कार्यकर्त्यांचे नागरिकांनी कौतुक केले. “आपल्या परिसरात झाडे लावा, हिरवाई वाढवा!” असा संदेश देत अजितदादा पवार यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून पर्यावरणपूरक सामाजिक उपक्रमातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी आदर्श निर्माण केला आहे.

> “वृक्ष ही निसर्गाची अमूल्य देणगी आहे. प्रदूषणमुक्त, स्वच्छ आणि हिरवा प्रभाग घडवण्यासाठी प्रत्येक नागरिकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करणे हे आपले कर्तव्यच नाही, तर भविष्यासाठीची शाश्वत गुंतवणूक आहे.”
>
> **-प्रा. कविता आल्हाट,**
> शहराध्यक्षा, राष्ट्रवादी महिला काँग्रेस.


KAMALA Education Society

KES’S PRATIBHA GROUP OF INSTITUTES’

PRATIBHA COLLEGE OF COMMERCE & COMPUTER STUDIES

ACCREDIATED WITH GRADE A NAAC

Permanently Affiliated to Savitribai Phule Pune University

ADMISSIONS OPEN FOR THE YEAR 2025-26

UG & PG Courses in Arts, Commerce, Science, Computer Science & Management

B.A. English/ Economics/ Psychology | B.Com. Regular | B.Com. Business Management | B.Com. International Business | B.Com. Computer Application | B.Sc. Chemistry | B.Sc. Statistics

B.Sc. Cyber Security | B.Sc. Computer Science | B.Sc. Computer Application | B.Sc. Data Science | B.Sc. Information Technology | M.Com

B.Sc. Cyber & Digital Sci. | B.Sc. Nano Sci. & Nano Tech. | B.Sc. AI & Machine Learning | PH.D. Commerce & Management

M.Sc. Cyber Security | M.Sc. Data Science | M.Sc. Computer Science | M.Sc. Computer Application | M.Sc. Statistics/ Organic Chemistry | M.A. English/ Psychology | PH.D. English

Eligibility: For Under Graduation : Passed 12th (HSC) | for Post Graduation: Graduation in respective field

For Admission Enquiry Call : 8600189162, Timings: 9 am to 5 pm

Campus: Block D-III, Plot No. 3, Behind Mehta Hospital, Old Mumbai Pune Highway, Kalbhor Nagar, Chinchwad, Pune 19

For more details please visit us at: www.pcccs.org.in

# एसबीपीआयएम" शैक्षणिक स्वायत्तता अभिमानास्पद!

## मा. आमदार ज्ञानेश्वर लांडगे : "पीसीईटी"च्या मुकुटात आणखी एक मानाचा तुरा




**। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।**

**पिंपरी-चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या अंतर्गत २००९ मध्ये स्थापन झालेल्या एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (एसबीपीआयएम) या संस्थेने व्यवस्थापन शिक्षण क्षेत्रात एक प्रतिष्ठित आणि विद्यार्थी प्रिय एमबीए संस्था म्हणून नाव कमावले आहे. येथून महाराष्ट्रासह देशभरातील विविध जिल्ह्यांतून आलेल्या २५०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी एमबीएची पदवी प्राप्त केली आहे.**

यूजीसी आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून शैक्षणिक स्वायत्तता प्रदान करण्यात आली आहे याचा पीसीईटी च्या विश्वस्त मंडळाला सार्थ अभिमान आहे, असे ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे यांनी सांगितले. तसेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न पीएचडी संशोधन केंद्रातून आजपर्यंत ३८ विद्यार्थ्यांनी पीएचडी पदवी प्राप्त केली आहे तर ५५ विद्यार्थी हे पीएचडीचे संशोधन करत आहेत हे देखील गौरवास्पद आहे असे लांडगे म्हणाले.

पीसीईटीच्या स्थापनेला ३३ वर्षे पूर्ण होत असताना यावर्षी एसबीपीआयएम ला स्वायत्तता मिळाली. महाविद्यालयाच्या नियामक मंडळाच्या प्रथम बैठकीत ज्ञानेश्वर लांडगे बोलत होते. यावेळी पीसीटीच्या उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयूचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, एसबीपीआयएम च्या संचालक डॉ. किर्ती धारवाडकर, विद्यापीठ नामनिर्देश सदस्य डॉ. राजेश पहुरकर, उद्योजक सागर बाबर, उद्योग तज्ञ राजेश माल्ल्या, डॉ. रूपाली कुदरे, डॉ. काजल माहेश्वरी, डॉ. भूषण परदेशी, डॉ. अनिषकुमार कारिया आदी उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. रूपाली कुदरे, आभार डॉ. कीर्ती धारवाडकर यांनी मानले.

### केवळ पदवी नाही, तर विद्यार्थ्यांचा कौशल्य विकास

डॉ. किर्ती धारवाडकर यांनी सांगितले की, देशाच्या सर्वांगीण विकासामध्ये व्यवस्थापन क्षेत्रात कुशल मनुष्यबळ तयार करण्याच्या उद्देशाने प्रेरित झालेल्या या संस्थेमध्ये जबाबदार तसेच सुसंस्कृत नागरिक घडवण्याचे काम प्राध्यापक वर्ग करीत आहे. एसबीपीआयएम मध्ये ८० टक्के प्राध्यापक पीएचडी धारक आहेत. ही संस्था मूल्यांवर आधारित उत्तम शिक्षण देणारे केंद्र आहे. आम्ही आमच्या विद्यार्थ्यांना केवळ पदवी नाही तर उद्योग जगतात टिकणारे कौशल्य, आचारसंहिता आणि सामाजिक भान देतो. या संस्थेचे अनेक माजी विद्यार्थी देश, विदेशात विविध क्षेत्रांमध्ये यशस्वीपणे कार्यरत आहेत. संस्थेला "नॅक ए प्लस" दर्जा आणि "एनबीए" मान्यता प्राप्त एमबीए प्रोग्राम आहे. तसेच आता पुढील पिढीला उद्योगसज्ज आणि जागतिक नागरिक घडविण्यासाठी अधिक सक्षमपणे काम करू असा विश्वास डॉ. धारवाडकर यांनी व्यक्त केला.



# उद्योगभिमुख शिक्षण देण्याची गरज-संदीप कदम

## शिक्षण विश्व: पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या एआय इंटरनॅशनल इनोवेशन लॅबचे उद्घाटन






। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**विद्यार्थ्यांना भविष्यात कौशल्य विकास प्रशिक्षण देऊन उद्योगभिमुख शिक्षण देण्याची गरज आहे. आगामी काळ हा तंत्रज्ञान आणि विज्ञान यांचा आहे. भविष्यातील ही गरज ओळखून आर्टिफिशियल इंटेलिजन्स जास्तीत जास्त विद्यार्थ्यांपर्यंत अभ्यासाच्या माध्यमातून पोहोचविण्याचा मानस असल्याचे पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे मानद सचिव व सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे सिनेटर सदस्य संदिप कदम यांनी केले.**

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे श्री संत तुकाराम विद्यालय लोहगाव येथे आज महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री व संस्थेचे अध्यक्ष अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त संस्थेतील पहिल्या ए आय इंटरनॅशनल इनोवेशन लॅबचे उद्घाटन संस्थेचे मानद सचिव व सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे सिनेटर सदस्य संदिप कदम यांनी केले.

विद्यार्थी व शिक्षकांना मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांना भविष्यात कौशल्य विकास प्रशिक्षण देऊन उद्योगभिमुख शिक्षण देण्याची तयारी या एआय इनोवेशन लॅबच्या माध्यमातून केली जाणार आहे. संस्थेचे अध्यक्ष अजित पवार यांच्या दूरदृष्टीने संस्थेत सुरू असलेल्या उपक्रमांचा व वाटचालीचा आढावा घेतला तसेच संस्थेच्या अनेक शाखांमध्ये भविष्यात एआय लॅब सुरू करुन विद्यार्थ्यांना सर्व प्रकारच्या डिजिटल तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण दिले जाणार आहे असे सांगितले

वाढदिवसाच्या निमित्ताने चित्रकला, रांगोळी प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. विद्यालयातील हॉकी क्लब , स्काऊट गाईड व ढोल पथकाने सर्व मान्यवरांचे स्वागत केले. कार्यक्रमासाठी एअर गुरूजी इंटरनॅशनलचे सीइओ प्रताप पवार, प्रशासकीय अधिकारी राजेन्द्र खवले , मुख्याध्यापक शैलजा गायकवाड, उपमुख्याध्यापक संध्या गायकवाड, पर्यवेक्षक एस.डी. चव्हाण, राजाराम बापू पॉलिटेक्निक कॉलेजचे प्राचार्य श्री मुंढे आणि शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

### कार्यक्रमाचे प्रास्ताविक

मुख्याध्यापक सुनील लाडके, सूत्रसंचालन उमेश घुंडरे तर उपस्थित सर्वांचे आभार एस डी चव्हाण यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त केली. या निमित्ताने एस एस सी व एच एस सी परीक्षेत प्रथम क्रमांक आलेल्या मुलांचा तसेच हॉकी फेस्टिव्हलमध्ये विजयी झालेल्या हॉकी टिमचा सत्कार करण्यात आला निर्माण संस्थेच्या वतीने मा मानद सचिवांना हॉकी स्टिक भेट देण्यात आली. इयत्ता सातवी आणि आठवीच्या मुलांसाठी रोबोटिक्स , थ्रीडी प्रिंटर व ड्रोन कॅमेरा या विषयावर सेशन घेण्यात आले.